सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन,वित्त विभाग, निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५ / प्र.क्र.७१/ कोषा प्रशा-५, दि.०३/१०/२०२५

**विषय** :- निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान आदेश, उपदान प्रदान आदेश, अंशराशीकरण प्रदान आदेश (e-PPO, e-GPO,e-CPO) DigiLocker सुविधेमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७१/कोषा प्रशा-५, दि.०३/१०/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१००३१४५३०१९३०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 07-10-2025 00:04:46

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन प्रदान आदेश, उपदान प्रदान आदेश, अंशराशीकरण प्रदान आदेश (e-PPO, e-GPO, e-CPO) DigiLocker सुविधेमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७१/कोषा प्रशा-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०२५.

वाचा : १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण/२०२२/प्र.क्र.८२/कोषा प्रशा-५, दि. २४.०८.२०२३.
२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २०२४/प्र.क्र.३४/२०२४/कोषा प्रशा-५, दि. २२.०५.२०२४.

**प्रस्तावना:-**

**अ)** निवृत्तीवेतनधारकांसाठी निवृत्तीवेतन प्रकरण मंजूरी, प्रथम प्रदान व तद्नंतर नियमित मासिक प्रदानांच्या अनुषंगाने निवृत्तीवेतन प्रदान आदेश (Pension Payment Order), उपदान प्रदान आदेश (Gratuity Payment Order), अंशराशीकरण प्रदान आदेश (Commutation Pension Payment Order) हे अत्यंत महत्त्वाचे शासकीय आधारभूत अभिलेख आहेत. या दस्तऐवजाच्या आधारे निवृत्तीवेतन व इतर निवृत्तीवेतन विषयक लाभ प्राप्त होतात.

**आ)** यापूर्वी महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्तीवेतन प्रकरण मंजूर झाल्यानंतर निवृत्तीवेतन प्रदान आदेश मुद्रित स्वरूपात, कागदावर कोषागार कार्यालयास व निवृत्तीवेतनधारक यांना टपालाने व यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयास टपालाने किंवा हस्त बटवड्याने पाठविण्यात येत असत. परंतु अनेकदा सदर अभिलेख / आदेश हरवणे, खराब होणे किंवा व्यवस्थित जतन न करणे, निवृत्तीवेतनधारक व कोषागार कार्यालयास निवृत्तीवेतन प्रदान आदेश उशीराने प्राप्त होणे, पडताळणी प्रक्रियेत होणारा विलंब, या अडचणी दूर करून व शासकीय कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याच्या केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणानुसार शासकीय कामकाज अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने उपरोक्त वाचा मधील शासन निर्णयांन्वये e-PPO, e-GPO, e-CPO कार्यप्रणाली सुरू करण्यात आलेली आहे.

**इ)** भारत सरकारने "Digital India" या उपक्रमांतर्गत DigiLocker ही सेवा सुरू केली असून त्यान्वये नागरिकांना त्यांचे शासकीय दस्तऐवज / अभिलेख सुरक्षित व डिजिटल स्वरूपात उपलब्ध होतात. महाराष्ट्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा अंतर्गत निवृत्तीवेतन विषयक लाभ प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ महालेखापाल कार्यालयांकडून मंजूर करण्यात आलेले व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांना अग्रेषित करण्यात आलेले e-PPO, e-GPO, e-CPO प्रदान आदेश DigiLocker सोबत संलग्न

(Linked) करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१. महालेखापाल कार्यालय (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई व नागपूर यांचेकडून यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांना उपरोक्त वाचामधील शासन निर्णयांमध्ये नमूद करण्यात आलेल्या दिनांकांपासून निर्गमित करण्यात आलेल्या व कोषागार कार्यालयामार्फत रक्कम प्रदान करण्यात आलेल्या सर्व प्रकरणी; तसेच भविष्यात मंजूर करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्तीवेतन प्रकरणी निवृत्तीवेतन प्रदान आदेश, उपदान प्रदान आदेश, अंशराशीकरण प्रदान आदेश (e-PPO, e-GPO, e-CPO) DigiLocker सेवेशी दि.०६.१०.२०२५ पासून संलग्न (Linked) करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. निवृत्तीवेतनवाहिनी ही प्रणाली निवृत्तीवेतनधारकांसाठी त्याच्या निवृत्तीवेतन प्रक्रियेच्या सुरूवातीपासून ते निवृत्तीवेतन प्रदान करण्यापर्यंत ‘एकल खिडकी आज्ञावली’ असून निवृत्तीवेतनधारकांना त्याचे DigiLocker खाते निवृत्तीवेतनवाहिनी प्रणालीसोबत संलग्न (Linked) करण्याचा आणि e-PPO, e-GPO, e-CPO सहजतेने डिजिटल स्वरूपात मिळवण्याचा पर्याय याद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३. संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि महालेखापाल कार्यालय (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई व नागपूर यांच्यामार्फत विकसित करण्यात आलेल्या अनुक्रमे निवृत्तीवेतनवाहिनी आणि e-PPO, e-GPO, e-CPO प्रणाली या DigiLocker सेवेशी संलग्न (Linked) केल्यामुळे, निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या वैयक्तिक DigiLocker लॉगीनमध्ये निवृत्तीवेतन प्रदान आदेश, उपदान प्रदान आदेश, अंशराशीकरण प्रदान आदेश (e-PPO, e-GPO, e-CPO) अधिक सुलभतेने आणि तत्परतेने उपलब्ध होतील.

४. e-PPO, e-GPO, e-CPO प्रदान आदेश DigiLocker मध्ये उपलब्ध होण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी अनुसरावयाची कार्यपध्दती सोबतच्या “परिशिष्ट-१” मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१००३१४५३०१९३०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d4015606 38f644a547867205474ee5, cn=RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.10.03 14:54:25 +05'30'

**(डॉ.राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर)**

**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव.

३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण) यांचे सचिव / प्रधान सचिव.

४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि उत्पादन शुल्क) यांचे सचिव / प्रधान सचिव.

५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

६. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.

८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.

९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख,आणि कार्यालय प्रमुख.

१०. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई.

१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई

१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.

१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१.

१७.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.

१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.

२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.

२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.

२४. सर्व विभागीय आयुक्त.

२५. सर्व जिल्हाधिकारी.

२६. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२७. संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई.

२८. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई.

२९.सह संचालक,लेखा व कोषागारे,कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.

३०.सह संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.

३१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय मुंबई.

३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर.

३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

३४.सर्व उप कोषागार अधिकारी.

३५.वित्त विभागातील सर्व कार्यासने.

३६. निवड नस्ती कोषा. प्रशा.- ५ कार्यासन.

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७१/कोषा-प्रशा ५, दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०२५ सोबतचे सहपत्र

**परिशिष्ट -१**

## e-PPO, e-GPO, e-CPO प्रदान आदेश DigiLocker मध्ये उपलब्ध होण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी अनुसरावयाची कार्यपध्दती

**अ) DigiLocker खाते उघडणे.**

मोबाईल फोनमध्ये DigiLocker App (Android/iOS) डाउनलोड करावे किंवा www.digilocker.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन "Sign Up" वर क्लिक करून आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाच्या आधारे खाते उघडावे. OTP द्वारे पडताळणी पूर्ण करावी. अथवा यापूर्वी DigiLocker मध्ये लॉगिन तयार केलेले असल्यास सदरील लॉगिन वापरून DigiLocker मध्ये लॉगिन करावे.

**आ) विभाग शोधणे.**

"Issued Documents" किंवा "Search Documents" या पर्यायामध्ये जाऊन Maharashtra State पर्याय निवडून "Directorate of Accounts and Treasuries" शोधावे. त्यानंतर Pension Commutation Payment Order, Gratuity Payment Order, Pension Certificate हे पर्याय उपलब्ध होतील.

**इ) माहिती भरून दस्तऐवज मिळवणे.**

महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त झालेला निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्रमांक (e-PPO) व कोषागार कार्यालयाचे नाव ही माहिती भरून "Get Document" वर क्लिक करावे.

**ई) e-PPO, e-GPO, e-CPO उपलब्ध होणे.**

DigiLocker खात्यात e-PPO, e-GPO, e-CPO प्रदान आदेश स्वयंचलितरीत्या उपलब्ध होतील. तसेच PDF स्वरूपात डाउनलोड करता येतील.

**उ)** वरीलप्रमाणे कार्यवाही करताना काही शंका / अडचणी उद्भवल्यास DigiLocker या ॲप / संकेतस्थळावरील मदत कक्षास संपर्क साधावा.

**ऊ)** e-PPO, e-GPO, e-CPO DigiLocker सेवेशी लिंक करण्याबाबतचे माहितीपत्रक निवृत्तीवेतनवाहिनी https://pension.mahakosh.gov.in/login.jsp या वेब पोर्टलवरील User Manual >> Pension >> User Manual DigiLocker येथे उपलब्ध आहे.